# पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत मटका, गुटखा, पत्त्याचे क्लब, गांजा माफियांची वसुली करणारा हनुमंत उगले हा जिल्हा पोलिस प्रशासनाचा जावई आहे का?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## पोलीस कर्मचाऱ्याच्या बदलीमध्ये एसपींकडून भेदभाव झाल्याची पोलीस दलात चर्चा सुरु?


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २३८ ■ शनिवार दि.१७ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 238 ■ Saturday Dt.17 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# खऱ्याला सुरी आणि खोट्याला पुरी वारे व्वा पोलीस प्रशासनाची भाईगिरी?

## अहो, एसपी नवनीत कॉवत साहेब पेठ बीड पोलिस ठाण्यातील कथित बलात्कार प्रकरणातील आरोपींना तडजोड करून सोडून देणारा हनुमंत उगले हा संत झाला का?

### मनोरुग्ण मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमांकडून उगिलेंची आर्थिक तडजोड करून सोडून देणाऱ्या हनुमंत उगिलेला कोणासाठी वसुली करण्यास ठेवले आहे?

### वाल्मीक कराडच्या आशीर्वादाने हनुमंत उगलेंच्या कारवाईला ब्रेक दिला; तत्कालीन एसपी अविनाश बारगळ यांना वाल्मीक कराड यांनी केला होता एक फोन?

### तत्कालीन एसपी अविनाश बारगळ यांनी वाल्मीक कराडच्या दबावामुळे हनुमंत उगले वर झालेले कारवाई केली होती रद्द?

### कथित सामूहिक बलात्कार प्रकरणातील नराधम आरोपींना हनुमंत उगले नी आर्थिक तडजोडीमध्ये सोडून दिले, संबंधित चौकशीचे काय झाले एसपी नवनीत कॉवत यांनी उत्तर द्यावे?

बीड । प्रतिनिधी


बीड जिल्हा पोलिस दलातील वार्षिक सर्वसाधारण बदली प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. यासाठी पोलिस अधीक्षकांनी तीन महत्त्वाचे निकष लावले आहेत. एका तालुक्यात खंडित किंवा अखंडित १२ वर्षे सेवा, एका पोलिस ठाण्यात किंवा शाखेत ५ वर्षे सेवा सोबतच स्वत: रहिवासी असलेल्या तालुक्यातील ठाण्यात कार्यरत पोलिस कर्मचारी यांच्या बदल्या होत आहेत. त्यामुळे पहिल्यांदाच सुमारे ६७६ कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्यात येणार आहेत. परंतु पेठ बीड पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी हनुमंत उगले हे अनेक प्रकरणात वादग्रस्त ठरलेले आहे. वादग्रस्त ठरलेले असतानाही त्यांना त्याच ठिकाणी ठेवण्यात आले आहे. तसेच या पोलीस कर्मचाऱ्यांनी मनोरुग्ण मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपींना सहकार्य करून पाठबळ दिले होते. तसेच तीन आरोपींना घटनास्थळ डायल ११२ वरती कॉलर नंतर ताब्यात घेतले होते. व पीडित मुलीस सुद्धा ताब्यात घेतले संबंधित मुलगी मातंग समाजाची आहे. भीक मागून तिची आई वडील व ती आपला उदरनिर्वाह करत आहेत. यामध्ये ११२ वरती कॉल आल्यानंतर घटनास्थळावरून आरोपींची मोटरसायकल व आरोपी यांना पेठ बीड पोलिसांनी ठाण्यात घेऊन गेल्यानंतर त्या ठिकाणावर पोलीस कर्मचारी हनुमंत उगले ने प्रत्येक आरोपींकडून ८० हजार रुपये प्रमाणे तीन आरोपींकडून पैशाची मागणी करत ती पूर्ण केल्यानंतर त्या आरोपींना सोडून देण्यात आलेली आहे. सदरील घटना ही दि.१८ ऑगस्ट २०२४ मध्ये घडलेली आहे. सध्या बीडमध्ये पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात जवळपास ६०० पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्या बदलीची प्रक्रिया चालू आहे. त्यामुळे हनुमंत उगले पेठ बीड पोलीस ठाण्याचा पोलीस कर्मचारी यांची तात्काळ बदली होणे गरजेचे आहे. परंतु त्यांना बदली न करता त्याच ठिकाणी ठेवण्यात आलेले आहे. वादग्रस्त ठरलेली पोलीस कर्मचारी यांची बदली का होत नाही. असे अनेक प्रश्न त्यानिमित्त उपस्थित केले जात आहे. हनुमंत उगले नावाच्या पोलिस कर्मचाऱ्यांनी मनोरुग्ण मुलीवर बलात्कार प्रकरणातील आरोपींना सोडून दिले होते. त्यांच्यावरती तत्कालीन पोलीस अध्यक्ष नंदकुमार ठाकूर यांनी कारवाई केली होती. परंतु वाल्मीक कराडच्या मध्यस्थीने ही बदली रद्द करण्यात आली होती. वाल्मीक कराड यांना पाच लाख रुपये दिले असल्याचीही चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये जोर धरू लागली आहे. तर त्या ठिकाणी मात्र सध्याची परिस्थिती पाहिली तर हनुमंत उगले ला पुन्हा पेठ बीड पोलीस ठाण्यात अवैध धंदे करणाऱ्यांकडून हप्ते गोळा करण्यासाठी ठेवण्यात आली आहे का? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे. पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनेक अवैध धंदे सुरू आहेत. गांधीनगर येथे रशीद उर्फ मोघ्या यांचा क्लब राजवटपणे चालतो तो पोलीस कर्मचारी हनुमंत उगले यांच्याच आशीर्वादाने चालतो. गांधीनगर मध्ये गांजा, दारू, गुटखा, मटका आणि पत्याचे क्लब या सर्वांचा कलेक्शन हनुमंत उगले हे करत आहेत. पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या विरोधात जाऊन सध्याच्या परिस्थितीमध्ये हनुमंत उगले हा पोलीस कर्मचारी अवैध धंदे करणाऱ्यांकडून वसुली

पान २ वर









### पोलीस खात्याची इब्रत हनुमंत उगले या पोलीस कर्मचाऱ्यांमुळे वेशीला टांगली?

आठ पंधरा दिवसांपूर्वी पेठ बीड पोलीस ठाण्यात चे पोलीस निरीक्षक यांना बार्शी नाक्यावरती महाराज झाल्याची कमेंट पत्रकारांनी पोलीस अधीक्षक यांच्या व्हाट्सअपच्या पोलीस प्रेस ग्रुप वरती प्रश्न विचारले होते. त्यावेळी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी संबंधित प्रकरणावरती उत्तर दिले खरे परंतु संबंधित पत्रकारांना ही माहिती पुरवणारा हनुमंत उगलेच असल्याचेही पोलीस ठाण्यातील अनेक कर्मचाऱ्यांच्या तोंडातून ऐकायला मिळत आहे. पोलीस खात्याची इब्रत हनुमंत उगले या पोलीस कर्मचाऱ्यांमुळे वेशीला टांगली गेली आहे.

■ हनुमंत उगले हा पोलीस कर्मचारी पेठ बीड पोलीस ठाणे मध्ये कार्यरत आहे. यांच्याकडून कत्तलीसाठी जाणाऱ्या जनावरे, वाळू, मुरूम, गुटखा, मटका, दारू, तसेच पत्याचे क्लब सह अनेक अवैध धंद्याचे कलेक्शन चालू आहे. आणि हनुमंत उगले ने या अगोदर सुद्धा मनोरुग्न मुलीवरती पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये बलात्कार झाला होता. त्यातील आरोपीला आर्थिक तडजोडी मध्ये ठेवण्याचा ठपका पोलीस कर्मचारी हनुमंत उगले यांनी लावला. त्याची चौकशी होम डिवायएसपी उमेश कस्तुरे यांच्याकडे चालू आहे. त्या चौकशीचे काय झालं? पुढे याचे उत्तर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिले पाहिजे. तसेच हनुमंत उगलेला पेट बीड पोलीस ठाण्यातून बदली नव्हे तर पोलीस खात्यातून निलंबित केले पाहिजे अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून होत आहे. अशा भ्रष्ट आणि वादग्रस्त पोलीस कर्मचाऱ्याला पोलीस खात्यामध्ये न ठेवता निलंबित करून तत्का कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे. तत्कालीन एसपी अविनाश बारगळ यांनी हनुमंत उगले यांच्यावर कारवाई करून बदली केली होती. वाल्मीक कराड यांच्या सांगण्यावरून एसपी अविनाश बारगड यांनी ती बदली रद्द केली होती. वाल्मीक कराडला हनुमंत उगले ने एका पत्रकाराच्या माध्यमातून टीव्ही चॅनल चा पत्रकार यांनी परळी भेट घेतली. व पाच लाख रुपये दिले असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. त्यामुळे तत्कालीन एसपी यांनी वाल्मीक कराडाच्या दबावामुळे हनुमंत उगले वर झालेली कारवाई रद्द केली होती. तसेच आता यावर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सर्पदंशाने शेतकरी महिलेचा मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी



नेहमीप्रमाणे जेवण करून तीन महिन्याच्या बाळाला कुशीत घेऊन झोपलेल्या महिलेला अचानक सर्पदंश झाल्याने उपचारार्थ अहिल्यानगर येथे घेऊन जात असताना रस्त्यातच तिचा मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी पहाटेच्या दरम्यान घडली. मंदा संदिप खैरे वय वर्ष २२ असे मृत महिलेच नाव आहे. आष्टी तालुक्यातील गितेवाडी येथील मंदा संदिप खैरे हि महिला नेहमीप्रमाणे बुधवारी जेवण करून मुलाबाळांसह कच्या घरात झोपल्या होत्या. अचानक रात्रीच्या दरम्यान तिला सर्पदंश झाला. पती संदिप यांनी तातडीने शेजाऱ्यांना उठवत त्याच्या मदतीने कडा, आष्टी येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारार्थ अहिल्यानगर येथे जात असताना गुरूवारी पहाटे अडीजच्या दरम्यान तिचा मृत्यू झाल्याची घटना घडली. शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. तिच्या पाश्यात पती, मुलगी व तीन महिन्याचा मुलगा असा परिवार आहे.

## आईस्क्रीम विक्रेत्याला मारहाण करत पोटाला पिस्टल लावून दारुसाठी ४ हजार ९०० रु घेतले

### पीआय सुर्यतळळ यांच्या कार्यकाळात माजलगाव शहरात वाढला गुंडाराज?

माजलगाव । प्रतिनिधी

शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या छत्रपती संभाजी म हाराज चौकातील एका आईस्क्रीम विक्रेत्याला जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्या पोटाला पिस्टल लावून दारु प्यायला त्याच्या फोन पे द्वारे आरोपीने स्वत: च्या फोन पे वर ४ हजार, ९०० रु घेऊन मारहाण करुन जखमी केल्याची घटना घडली. प्रकरणी पिडीत फिर्यादी योगेश अर्जुन तौर रा. छत्रपती नगर, माजलगाव याने १४ मे रोजीच्या पहाटे १:२८ वा. शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ३० एप्रिल २०२५ रोजी प्रकरणातील आरोपी नामे तात्यासाहेब जाधव (पुर्ण पत्ता नाही) याने फिर्यादी योगेश तौर च्या आईस्क्रीम गाड्यावर नौकर बबलु माने याला चापटाने मारहाण केली होती.



आरोपी नामे जालिंदर काशीनाथ गायकवाड रा केसापुरी कैंप, ता. माजलगाव याने फिर्यादीस धमकी दिली होती की, जावयाचा मोबाईल फुटला आहे. नवीन मोबाईल घेऊन दे नसता आईस्क्रीमचा गाडा चालवु नको, नंतर १३मे रोजीच्या सांयकाळी ६:४५ वा छत्रपती संभाजी महाराज चौकातील स्वागत खानावळ च्या बाजुला आईस्क्रीम विक्री करत असताना आरोपी संतोष उत्तम गायकवाड रा केसापुरी कैंप, ता.माजलगांव हा दोन अनोळखी आरोपीला घेऊन मोटारसायकल वर आला आणि योगेश तौर ला म्हणाला की, त्यांच्या दाजीला का मारले तेवढ्यातच संतोष गायकवाड याने त्याच्या जवळ असलेला पिस्टल योगेश च्या पोटाला लावून म्हणाला की, दारु प्यायला पैसे दे नसता मारुन टाकीन. यानंतर त्याने योगेश च्या मोबाईल फोन पे वरुन ४ हजार, ९००रु त्याच्या फोन पे वर घेतले व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत वायफरच्या स्टील पाईप, बैनर च्या लोखंडी फ्रेम चे पाईपने पाठी, पायावर मारुन जखमी केले. अशा आश्याच्या फिर्याद वरुन नमुद नामे ३व अनोळखी २ आरोपीं विरोधात भान्यासं २०२३चे कलम ११९(१), ११८(१), ११५ (२), ३५२, ३५१(२), ३(५) सह भारतीय शस्त्रबंदी कायद्याच्या कलम ३, २५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असुन पुढिल तपास पोउपनि राठोड करत आहेत.

## मद्यधुंद कंटेनर ड्रायव्हरचा केज शहरात धुमाकुळ



केज । प्रतिनिधी

काल दुपारी मातेफिरू कंटेनर ड्रायव्हरने मद्यधुंद अवस्थेत फिल्मी स्टाईलने केज शहरासह डोणगाव टोल नाका ते लोखंडी सावरगाव दरम्यान अनेकांना चिरडले. गाडी क्र.डीडी ०१ झेड ९७७१ असा असून यामध्ये १९ ते २० लोक गंभीर जखमी झाले आहेत. ०८ ते १० गाड्या चिरडून त्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. एक महिला जागीच ठार झाल्याचे वृत्त हाती आले आहे. ठार झालेली महिला मीना प्रवीण घोडके या टाकळी गावच्या रहिवासी असल्याचे समजते. याच कंटेनरने धडक देत श्रद्धा चिंचकर (येवता) यांना दहा ते पंधरा फूट सिमेंट रोड वरती घासत नेले.

या तरुणीस अंबाजोगाई येथील रुग्णालयात तातडीने हलवण्यात आले. याच प्रमाणे बळीराम

पान २ वर

# पाणीच पाणी चोहीकडे गेला रस्ता कुणीकडे

## गढी ते तालखेड रस्त्यांवर पाण्याचा महासागर ओसंडून वाहू लागला

## ठेकेदाराचे आडमुठे धोरण रस्त्यावरचं पाण्याचे तोरणं जिव धोक्यात घेऊन एखादा तरी मरेल? आ.विजयसिंह पंडित या रस्ता प्रश्नांकडे तात्काळ लक्ष घाला; स्थानिकांची मागणी!

गेवराई । प्रतिनिधी



माजलगाव राष्ट्रीय महामार्ग असलेल्या कल्याण विशाखापट्टणम या माजलगाव – गढी दरम्यान मोठ – मोठे खड्डे पडल्याने राष्ट्रीय महामार्ग खड्ड्यात गेल्याची परिस्थती निर्माण झाली असुन या खड्ड्यांमुळे डांबरी रस्त्यावरून जाताना या मुख्य रस्त्यावर तळ्याप्रमाणेच साचलेल्या पाण्यामुळे वाहनधारकांना जायचे कुठून असा प्रश्न पडतोय सिरसदेवी गावातील रस्त्यावर असलेल्या पाण्याला खळखळीत महासागराचे स्वरूप प्राप्त झाले आहेत आणि वाहनधारकांना यामुळे आपघातास निमंत्रण मिळत आहे. त्यामुळे रस्ते विकास प्राधिकरणने हे रस्त्यावर असलेल्या त्रासापासून मुक्त करावे अशी मागणी प्रवाशांतुन जोर धरत आहे. माजलगाव शहराच्या बाह्यवळण रस्त्यावर कल्याण – विशाखापट्टणम या राष्ट्रीय महामार्गाचे काम काही दिवसांपुर्वीच झालेले आहे. त्यामुळे माजलगाव देशाच्या नकाशावर आले असुन या रस्त्यांमुळे दळण – वळणाची चांगली व दर्जेदार सोय झाली आहे.

या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतुक देखील आहे तर सोलापुर धुळे या हायवेला देखील हा रस्ता जोडला आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, अहमदनगर अशा स्मार्ट शहरांना माजलगाव जोडले गेलेले आहे. त्याचबरोबर याच रस्त्यावर माजलगावची एमआयडीसी देखील असुन याठिकाणी कार्यरत छोट्या – मोठ्या उद्योगातील वाहनांची देखिल मोठी रेलचेल या रस्त्यावरून होते. माजलगाव – गढी या पन्नास किमी अंतर असलेल्या रस्त्यावर मोठ – मोठे जिवघेणे खड्डे पडले आहेत तसेच सिरसदेवी जवळ मोठ्या प्रमाणात खड्डे पडून त्यात भले मोठे पाणी साचले आहे तर अनेक ठिकाणी रस्ता जंपींग जपाक स्थितीत खाली – वर झाला आहे. माजलगाव शहराच्या बाह्यवळण रस्त्यावर या रस्त्याच्या कामांत नाल्यांचे काम देखील चांगल्या प्रकारे केलेले नाही त्यामुळे पावसाचे पाणी तसेच नाल्यांचे पाणी रस्त्यावरच साचुन राहते. त्यामुळे देखिल रस्त्यांची दुरावस्था होत आहे. त्यामुळे पाण्यापासून बचाव करताना आपघातास निमंत्रण मिळत आहे. या आपघातात जिव गेल्यास हा रस्ता दुरूस्त होणार का ? असा सवाल प्रवाशांतुन उपस्थित केला जात आहे. रस्ते विकास प्राधिकरणाने लक्ष देण्याची गरज या रस्ता कामाच्या सुरूवातीपासुनच शहराच्या बाह्यवळण रस्त्यांवर नाल्या व्यवस्थित कराव्यात कारण ते पाणी त्यात समाविष्ट होईल अशी मागणी होती परंतु या मागणीकडे दुर्लक्ष करत या रस्त्यांचे काम करण्यात आले.

आज घडीला जागो – जागी झालेल्या खड्ड्यांमुळे अडचणींचा सामना दुचाकीस्वार, चारचाकी स्वारांना तसेच मोठ – मोठ्या वाहनधारकांना करावा लागत आहे. त्यामुळे या खड्डेमय रस्त्याच्या मधोमध पाण्याचा ढव असल्याने दुरूस्तीकडे रस्ते विकास प्राधिकरणने लक्ष द्यावे. माजलगाव राष्ट्रीय महामार्ग की खड्डे मार्ग या रस्त्यावरून ये – जा करतांना वाहन चालविणे जिकीरीचे ठरत आहे. धावत्या गाडीसमोर अचानक पाण्यातून बचाव करताना आपघात होतो. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग की पाण्याचा मार्ग असा सवाल प्रवाशांतुन उपस्थित केला जात आहे. माजलगाव गढी दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर जागो–जागी खड्डे पडले आहेत. आणि या प्रश्नांकडे विद्यमान आमदार विजयसिंह राजे पंडित यांनी लक्ष घालावे अशी मागणी होत आहे.

पान १ वरून...

### खऱ्याला सूर्य आणि खोट्याला...

करताना राजरोसपणे दिसत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्याला अरेरावी करणे पोलीस स्टेशनमध्ये वर्दीवर न येणे, रात्री किंवा सकाळी ची हजेरी असेल त्यावेळेस गैरहजर राहणे, हजुरी मेजर सोबत वाद घालणे, मला ही ड्युटी मला का लावली असे सांगणे मनावर ड्युटी घेणे, खाजगी शिफ्ट गाडीमध्ये रात्रपाळी नाईट ड्युटी करणे, दारू तसेच पत्त्याचे क्लब मटका गांजा सह गांधीनगर बार्शी नाक्यावरती अवैधरित्या शिंदी ताडी विक्री करणाऱ्यांकडून हप्ते वसवली करताना हनुमंत उगले दिसत आहे. तर वाळू माफिया यांचा नंगानाच चालू आहे. रात्री नऊ ते सकाळी आठ वाजेपर्यंत इमामपूर, नाळवंडी, अंतरंग पिंपरी, पांगर बावडी बार्शी रोड, पाली परिसर या परिसरातील डोंगरातून खोदकाम करून भीम शहरांमध्ये येणाऱ्या मुलींच्या गाड्या हनुमंत उगले यांच्या आशीर्वादाने चालतात. तर बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे काम हे खायला सूर्य आणि खोट्याला पूरी देत आहेत का? असं आता पोलीस खात्यामधील अनेक अधिकारी तसेच कर्मचारी हे वादग्रस्त ठरलेल्या हनुमंत उगले सारखे अनेक कर्मचाऱ्यांच्या पाठीशी पोलीस अधीक्षक हे खंबीर उभे आहेत का? हनुमंत उगले चे कारनामे हे बीड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचाऱ्यांना तसेच जनतेला माहिती आहे. हनुमंत उगले या पोलिसांनी या अगोदर सुद्धा ते बीड पोलीस ठाणे हद्दीमधील मनोरुग्न अल्पवयीन भीक मागून जगणाऱ्या मुलीवर बलात्कारातील आरोपी आर्थिक तडजोडी मध्ये पोलीस ठाण्यात आल्यानंतर सोडून दिले होते. त्याचाही ठपका हनुमंत उगले वर आहे. हनुमंत उगले हा अधिकाऱ्यांसह जनतेला सुद्धा अरेरावीची भाषा करणारा कर्मचारी आहे. असल्या भ्रष्ट पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाठीशी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत खंबीरपणे उभा आहे का? आहेत हे समजणे कठीण झाले आहे. अशा भ्रष्ट पोलीस कर्मचाऱ्याला त्याच ठिकाणी ठाण का देण्यात येत आहे हे स्पष्ट जाहीर करण्यात यावे. अशा भ्रष्ट पोलीस कर्मचाऱ्यांमुळे पोलीस खात्याची प्रतिमा काळी होत आहे.

### मद्यधुंद कंटेनर ड्रायव्हरचा...

पांचाळ धाकेफळ, आशालता मुंडे चारधारी, सिद्धेश्वर शिंदे पिंपरी, शेषेराव चंदनशिव शिरपूर, फुलाबाई सावंत सुगाव, बेबी देशमुख बोरिसावरगाव, श्रीकृष्ण कापरे कापरेवाडी, कुमार गायकवाड देवगाव तसेच युसुफ वडगाव पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित कॉन्स्टेबल शिंदे आदी अपघातात गंभीर जखमी झाले असून अंबाजोगाई येथील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

सविस्तर माहिती अशी आहे की, डोणगाव टोल नाक्यावर कामगार काम करत असताना त्यांच्या समोरून एक ऑल इंडिया परमिट कंटेनर टोल नाक्याच्या कॅबिनला धक्का मारून पुढे निघून गेला. अंबाजोगाई कडे जाणाऱ्या या कंटेनरच्या मागे लोक पाठलाग करत त्याला थांबवण्याचा प्रयत्न करत होते. परंतु मद्यधुंद अवस्थेत झिंगलेला ड्रायव्हर थांबायला तयार नव्हता. कंटेनरकडे सर्वांचे लक्ष होते, काहीजण या कंटेनरचा पाठलाग करून ड्रायव्हरला कंटेनर थांबवण्याचा इशारा करत होते, परंतु तो कोणाचे ऐकायला तयार नव्हता. गाडीचा वेग कमी करायला तयार नव्हता. टाकळी फाट्यावरती एका टू व्हीलर ला सौम्य धडक देऊन तो पुढे केजच्या दिशेने निघाला. केज शहरातील शिक्षक कॉलनी जवळील काही गाड्यांना घासत तो पुढे शहरात घुसला.

केज शहरात शुक्रवारचा आठवडी बाजार असल्याकारणाने येथे चांगलीच गर्दी झालेली होती. रस्त्याच्या आजूबाजूला अनेक ठिकाणी टू व्हीलर आणि इतर वाहनांची गर्दी होती. हा कंटेनर वाहनांना आणि गर्दीला चिरडत शहरातील जुन्या पोलीस स्टेशन समोर गेला. तेथे मीना प्रवीण घोडके वय ३७ वर्षे यांना उडवले असता त्या जागेवर ठार झाल्या. येथेच श्रद्धा चिंचकर या तरुणीस धडक दिली असता ती १५ ते २० फूट सिमेंट रोड वरती घसरत गेली. तातडीने तिला आंबाजोगाई येथील हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. एवढे होऊन देखील हा कंटेनर थांबायला तयार नव्हता. तो पुढे मंगळवार पेठेमध्ये बाजार असलेल्या ठिकाणी काही टू व्हीलर ला घासून पुढे जय भवानी चौकात निघून गेला. जय भवानी चौकात एका पुरुषाला गंभीर धक्का देऊन पुढे अंबाजोगाईच्या दिशेने निघून गेला.

या घटनेने केज शहरात सगळीकडे गोंधळ उडाला. बराचसा जमाव आपल्या गाड्या घेऊन या कंटेनरच्या मागे पाठलाग करत निघाला. या घटनेचा मागोवा पोलिसांनाही लागला होता. पोलिसांनी संबंधित कंटेनरचा पाठलाग करत फोटो अंबाजोगाई पोलीस स्टेशनला फॉरवर्ड करत त्याला ताब्यात घेण्याचे निर्देश दिले. त्या पद्धतीने अंबाजोगाई पोलीस स्टेशन सावध झाले. इकडून कंटेनर अंबाजोगाईच्या दिशेने भरधाव जात असताना त्याने आणखीन काही लोकांना रस्त्यात चिरडले. लोखंडी सावरगाव येथील काही तरुणांनी या मातेफिरू ड्रायव्हरला थांबवण्यासाठी आपला ट्रॅक्टर आडवा लावला, परंतु यालाही न जुमानता त्याने दुसऱ्या बाजूने आपला कंटेनर पुढे सरसावला. पुढे त्याचे संतुलन बिघडल्यामुळे लोखंडी सावरगाव जवळ त्याचा अपघात होऊन रस्त्याच्या कडेला कंटेनर पलटी झाला. पाठलाग करणाऱ्या काही वाटसरूंनी ड्रायव्हरला कंटेनरच्या बाहेर काढत बेदम मारले. ऐनवेळी अंबाजोगाई पोलीस पुढे सरसावले व त्यांनी ड्रायव्हरला ताब्यात घेतले. तिथून पोलीस निघून गेल्यानंतर संतप्त जमावाने गाडी पेटवून दिली. हा थरार एवढा भयानक होता की ज्यांनी तो आपल्या डोळ्यांनी बघितला त्यांनी आपण थोडक्यात वाचलो असल्याचे स्पष्ट केले. या घटनेमध्ये अनेक जण गंभीर झाले असून यामध्ये एक जण महिला ठार झाल्यामुळे पूर्ण बीड जिल्ह्यामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

# पंजाब शिंदे यांचे अपहरण करून जीव मारण्याचा डाव अपयशी ठरला

## बीड येथील धक्कादायक प्रकार उघडकीस

## हॉटेलमधील कामगार धावून आल्याने जीव वाचला

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील गिराम नगर पांगरी रोड बीड येथील पंजाब पांडुरंग शिंदे (३३) यांची दि.१३ रोजी रात्री ०९ वाजण्याच्या सुमारास आरोपी दिनेश पोपट ठोसर, विठ्ठल गायकवाड, बालाजी बहिरवाळ, मयूर खोमने यांनी संगणमताने पंजाब शिंदे यांच्या घरासमोर येऊन तू आमचा फोन का उचलत नाहीस असे म्हणून घराबाहेर बोलवले व बोलत असताना मारहाण करत घरासमोर उभे असलेल्या काळ्या रंगाच्या स्विफ्ट गाडी मध्ये जबरदस्तीने बसवले व पांगरी रोड वासनवाडी फाटा मसोबा फाटा या मार्गे नगर रोड ने रात्री ९.५३ वाजण्याच्या सुमारास मुर्शिदपूर फाटा वरील हॉटेल देवराज बियर बार अँड परमिट रूम या हॉटेलवर बळजबरीने घेऊन गेले व तु प्रशांत डिंबाले यांच्या क्रेटा गाडीच्या व्यवहारामध्ये तू मध्यस्थी केल्यामुळे त्या गाडीच्या व्यवहारातील ५ लाख रुपये तु मला दे असे म्हणत पंजाब शिंदे ला हॉटेल देवराज येथील दोन नंबर केबिनमध्ये मारहाण करून गंभीर रित्या जखमी केले हा प्रकार पाहून बाजूलाच काउंटर व इतर ठिकाणी असलेले कामगार धावून आले.

या दरम्यान त्याचा जीव वाचवण्यासाठी तो हॉटेलच्या बाहेर पळत रोड वरून खाली उतरून डोंगर दरीतून अंधारातून जमेल त्या दिशेने पळत राहिला पुढे रात्री २.३० वाजण्याच्या सुमारास गवळवाडी, चऱ्हाट गावच्या शिवारा मध्ये खडीक्रेशरवर जाऊन लपून बसला व सदर स्टोन क्रेशर येथील एका कामगाराला झोपेतून उठून मला खूप मारहाण झाली आहे असे सांगितले त्यावेळी थोड्या वेळाने फिर्यादीचे भाऊ अँड सतीश शिंदे व पोलीस गाडी मध्ये पोलीस कर्मचारी आले व त्याला तेथून सकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड मध्ये घेऊन आले त्यानंतर दिनांक १४/०५/२०२५ रोजी दुपारी ४.१७ वाजता वरील आरोपी दिनेश पोपट ठोसर, विठ्ठल गायकवाड, बालाजी बहिरवाळ, मयूर खोमने यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) २०२३/१०९, १४०(१), ११८(२), ११८(१), ११९(१), ११५(२),३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५), अनुसूचित जाती आणि जमाती अन्याय अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९/ ३(१)(ा),३(१)(ा),३(२)(िं) नुसार शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड मध्ये गुन्हा नोंद झाला असून त्याचा तपास पोलीस करीत आहेत.

# बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या सहकार संकुल बांधकामास ना. अजित पवार यांच्याकडुन हिरवा कंदिल

## आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नाला यश

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सहकार विभागाचा भुखंड मागील अनेक वर्षापासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत आहे. या भुखंडावर सहकार विभागातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन बीड शहराच्या वैभवात भर घालील अशी आकर्षक व देखणी वास्तु उभारावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. ना. अजितदादा पवार यांनी सहकार संकुलाच्या बांधकामास हिरवा कंदिल दाखविला असुन प्रशासनाला या बाबतचे आदेश दिले आहेत. इमारत बांधकामाचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तु शास्त्रज्ञाकडुन तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला मिळाले आहेत. पालकमंत्री म्हणुन बीड जिल्ह्यासाठी सहकार संकुलाची प्रशासकीय इमारत ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातुन मिळणार आहे.



बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सर्व्हे नंबर १७९९ मध्ये सहकार आयुक्त यांच्या नावाने १५१५.९४ चौरस मिटर आकारमानाचा भुखंड आहे. या शासकीय भुखंडावर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित होते. शहरातील काही व्यापाऱ्यांनी खाजगी प्रयोजनासाठी या जागेची मागणी शासनाकडे केली होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या जागेवर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाचे बांधकाम व्हावे यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले. ना. अजितदादा पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पाडेल अशी आकर्षक वास्तु निर्माण करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला त्यांनी हिरवा कंदिल दाखवत सहकार संकुलाच्या बांधकामास मान्यता दिली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक, देखरेख संघ यासह सहकार विभागातील लेखा परिक्षण विभागाची कार्यालये आणि सहकार विभागाशी संबंधित प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सहकार संकुलात समाविष्ट करुन ही सर्व कार्यालये एका छताखाली आणुन सहकार विभागाची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचा मार्ग या माध्यमातुन मोकळा झाला आहे. पालकमंत्री म्हणुन ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर घालणारी शासकीय वास्तु जिल्हायाच्या ठिकाणी उभारत असल्याचे समाधान आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले आहे.

# रणवीर (काका) पंडित; एक प्रेरणादायक युवा नेतृत्व

समाजाच्या प्रगतीसाठी उत्साही, जागरूक आणि कार्यशील तरुणांची नितांत गरज असते. अशाच प्रकारचे नेतृत्व गेवराई तालुक्यातील श्री.रणवीर काका पंडित यांनी साकारले आहे. खेळाची आवड, स्पर्धेतील सहभाग आणि समाजकार्यातील सक्रियता या सर्व गुणांचा मिलाफ त्याच्यात पाहायला मिळतो. रणवीर यांना लहानपणापासूनच खेळांची विशेष आवड आहे. त्यांनी कोरोनाच्या संकट काळातही ऑस्ट्रेलिया मध्ये जाऊन क्रिडाक्षेत्रात गेवराई तालुक्यासाठी काहीतरी चांगले करावे व गेवराई तालुका हा उत्कृष्ठ खेळाडूंचा तालुका म्हणून ओळखला जावा यासाठी पदव्युत्तर शिक्षण घेतले. यातून त्यांची तालुक्यांतील युवापिढी विषयी असलेली तळमळ दिसून येते.

त्यांनी खेळातून शिस्त, सहकार्य आणि नेतृत्वगुण आत्मसात केले. या गुणांचा उपयोग करत त्यांनी शारदा स्पोर्ट्स अकॅडमी ची स्थापना केली व त्यातून अनेक उत्कृष्ठ खेळाडू घडविण्याचे कार्य ते करत आहेत. त्याच बरोबर जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी गेवराई तालुक्यात भव्य शालेय क्रीडामहोत्सवाचे आयोजन ते करतात. या महोत्सवात विविध शाळा व महाविद्यालयांतील असंख्य तरुणांनी, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. रणवीर यांच्या आयोजनातून युवकांना प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले. रणवीर यांचे कार्यक्षेत्र हे फक्त क्रीडा क्षेत्रापुरतेच मर्यादीत नसून तालुक्यातील लोकांच्या विविध समस्या ओळखून त्यांनी त्या सोडवण्याचा प्रयत्न सुरू केला.



गावातील पाण्याची समस्या, रस्त्यांची दुरवस्था, बेरोजगारी, शिक्षणाची कमतरता यावर ते सातत्याने काम करत आहेत. सतत लोकांच्या संपर्कात राहून तालुक्यातील नागरिकांच्या समस्या, प्रश्न ते सोडवत आहेत. माजी मंत्री आदरणीय शिवाजीराव दादा पंडित व आदरणीय अमरसिंह पंडित साहेब यांचा वारसा पुढे चालवत युवा पिढीला शिक्षणाबरोबरच खेळाविषयी आवड निर्माण करुन उत्कृष्ठ खेळाडू घडविण्याचे कार्य ते करत आहेत. त्याच बरोबर समाजकारण करुन लोकांच्या समस्या ते सोडवत आहेत.

श्री.रणवीर काका पंडित हे आजच्या तरुण नेतृत्वाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांच्या विचारसंपत्ती, कृतिशीलतेमुळे समाजात सकारात्मक बदल घडतो आहे. त्यांनी पुणे येथील एका गणपती आरती च्या कार्यक्रमात तेथील शिक्षण घेत असलेल्या मुलांना तुमचं शिक्षणं ज्या क्षेत्रात असेल ते शिक्षणं तुमच्या भागाच्या कामी आले नाही तर ते शिक्षणं व्यर्थ आहे. तुम्हाला तुमच्या क्षेत्रात यश मिळाले की त्याचा फायदा हा तुमचं गाव तालुका यास व्हावा म्हणजे पुढील पिढीला त्याचा फायदा होईल व आपले गाव व आपला तालुका विकसित होईल या संदेशांच्या माध्यमातुन युवा पिढीला ते विकासाच्या मार्गाने घेऊन जाण्याचे कार्य करत आहेत.

अशा युवा नेत्यांकडून तरुण पिढीने प्रेरणा घेऊन तालुक्याच्या हितासाठी कार्य केले पाहिजे. शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात लोकहितकारी कार्य करत असणारे युवा नेतृत्व श्री.रणवीर काका पंडित यांचा १७ मे रोजी जन्मदिन असतो. त्यांना माझ्याकडून जन्मदिनाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा.

# भागवताचार्य श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या श्रीमद् भागवत कथेतील उत्साह शिगेला

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील आदर्श व नामांकित कीर्तनकार, भागवताचार्य श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवणचे महंत श्री हभप गुरुवर्य श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या अमृततुल्य वाणीतून चार दिवसांपासून गवळवाडी येथे श्रीमद् भागवत कथा सुरू आहे. अक्षरश: गवळवाडीकरांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. नित्य काम धंदा बाजूला ठेवून अबालवृद्ध, महिला भगिनी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होत आहे. गजेंद्रमोक्ष कथा श्रवण करतांना नात्यागोत्यांची निर्थकता लक्षात घेऊन आत्मोद्धाराची जाणीव प्रत्येक श्रोत्यांच्या चेहऱ्यावर गांभीर्य लक्षात येत होते. श्रोत्यांचे हृदय हेलावून टाकणारे हृदयद्रावक विचार डोंगरे महाराजांच्या अमोघ वाणीतून प्रकट होत होते.सरोवर म्हणजे संसार आहे, गजेंद्र हा जीव आहे, नक्र हा काळ आहे, हे प्रत्येक माणसाने लक्षात घेऊन जीवन जगत स्वकल्याण करून घ्यावे. शेवटी आपणच आपली सोडवणूक करण्यासाठी व अंतकाळ हा यशस्वी करायचा असेल तर समग्र जीवन शुद्ध अंत:करणाने जगावे.



जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात, 'कळो येईल अंतकाळी प्राण प्रयाणाचे वेळी । राहती निराळी रांडापोरे सकळ ॥' म्हणून कुटुंब सांभाळत सांभाळत आपण सर्वांनी अंतकाळ लक्षात घेऊन जगावे. कथा ऐकतांना भाविक प्रसंगानुरूप अंतर्मुख होत होते. हलकाफुलका विनोद पेरून श्रोत्यांना खिळवून ठेवणारी वक्तृत्व शैली अलौकिक आहे. चार चार घंटे कथा श्रवण करतांना ना महाराजांची वाणी थकते, ना श्रोत्यांचे मन थकते, रोमांच उभे राहतात, उत्कंठा वाढते, स्तब्धता निर्माण होते, कधी कधी डोळ्यातून अश्रू कधी व कसे ओघळले हे लक्षातही येत नाही, कितीही ऐकले तरी मनाला तृप्तता लाभत नाही अशी कथेची अतृप्तता कायम राहते. अशीही कथा खरोखरच भाग्याने ऐकायला मिळते.

आत्मदेव चरित्र, प्रल्हाद चरित्र, ध्रुव चरित्र, अजामेळ चरित्र, गजेंद्र चरित्र, बळीराजा चरित्र, श्रवण करतांना देश, काल, वस्तू यांचे यथास्थित वर्णन ऐकताना श्रोते त्या काळात अल्पकाळासाठी जगत होते. अगाध शब्द संपत्ती, शुद्ध भाषा, अपार दाखले, बहुश्रुत विचार, ब्रह्मनिष्ठता आणि सामान्य भाविकांबद्दल अपार करुणा असे विशेष कौशल्य व गुण महंत श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या अमृततुल्य वाणीत आहे. गवळवाडीकरांचा कथेतील उत्साह वाखाणण्याजोगा आहे. गवळवाडी ग्रामस्थ, गवळवाडी तरुण मंडळी व महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

आज कथेसाठी श्री क्षेत्र नगद् नारायण महाराज जन्मभूमी संस्थानचे महंत श्री हभप रंगनाथ महाराज सुरळेगावकर, यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते. कथेतील साथ संगतीसाठी सिंथवादक गायनाचार्य प्रल्हाद महाराज समगे, संगीत विशारद गायनाचार्य भागवत महाराज नरवडे, तबला वादक लखन महाराज आळंदीकर,पॅडवादक महेश महाराज लोणकर. श्रोत्यांपर्यंत सुमधुर आवाज पोहचवण्याचे काम धनराज साउंड सिस्टीम वरवटी यांनी केले. दररोज कथा संपल्यानंतर गावकऱ्यांकडून महाप्रसादाचे नियोजन केले जाते आहे. कथेसाठी पालवण, वरवटी, तळेगाव, काकडहिरा, पिंपळवाडी, आहेर धानोरा, बीड परिसर, अंकुश नगर, पिंपरगव्हान, मुर्शदपूर या परिसरातून भाविक येत आहेत.

# चौसाळा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठया उत्साहात साजरी

## विविध जाती धर्मातील ५१ रक्तदात्यानी केले रक्तदान

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची सार्वजनिक जयंती मोठया उत्साहात व विविध समाजउपयोगी कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. सकाळी १० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक भव्य अभिवादन सभा आयोजित केली होती. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विवेक (बाबा) कुचेकर यांच्या शुभहस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी असंख्य मावळे मोठया सख्यंने उपस्थीत होते. सकाळी ११ वाजता चौसाळा शहरातुन भव्य मोटार सायकल रेली काढण्यात आली. ही रॅली चौसाळा बायपास येथिल धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात देखील अभिवादन करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती बीड चे संचालक दिपक (भाऊ) काळे, सुधाकर गुंजाळ, सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, सुरज सोनवणे, धर्मवीर संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे संस्थापक प्रदीप जोगदंड, जयंती अध्यक्ष समर्थ शिंदे,



उपाध्यक्ष बबलू शिंदे, सचिव आदीत्य हावळे, कोषाध्यक्ष आमोल कांबळे ईत्यादी मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तर ११-३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध जाती धर्मातील ५१ रक्तदात्यानी रक्तदान केले तर संध्याकाळी ०५ वाजता हनुमान मंदीर चौसाळा येथुन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकत प्रमुख आकर्षण आहील्यानगर जिल्हयातील कर्जत येथिल स्वरसंगम बॅन्जो व धाराशिव जिल्हयातील वाशी तालुक्यातील तांदळवाडी येथील भव्य रथ हे प्रमुख आकर्षण होते तर या मिरवणुकी दरम्यान चौसाळा शहरातील प्रत्येक महापुरुषांच्या चौकाला पुष्पहार अर्पण करण्यात आले. या मिरवणुकीत प्रत्येक जाती धर्मातील मोठया संख्येने सामील झाले होते. हा जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी संदेश खिवसंरा, अंगद शिंदे, विजयराजे शिंदे, अतुल भैय्या शिंदे, मधुकर तोडकर, राजेश (अप्पा) नाईकवाडे, तुकाराम जोगदंड, नानासाहेब शिंदे, सुधाकर गुंजाळ, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे संस्थापक प्रदीप (भाऊ) जोगदंड, यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती सोहळा मोठया उत्साहात पार पडला.

यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष समर्थ शिंदे, उपाध्यक्ष बबलू शिंदे, सचिव आदित्य हावळे, कोषाध्यक्ष आमोल कांबळे यांच्यासह स्वप्निल हुंबे, तुषार नाईकवाडे, गणेश औताडे, रोहित जोगदंड, शैलेश जोगदंड, सुरज जोगदंड, सचिन नाईकवाडे, बंटी शिंदे, पंकज शिंदे, उमेश जोगदंड, अमर नाईकवाडे, सागर शिंदे, विकास शिंदे, विठ्ठल कळासे, विकास नाईकवाडे, प्रसाद जालन, जगदीश हुंबे, सुरेश साळुंखे, सचिन इटकर,चंदन राहीज, युवराज जोगदंड, अक्षय कळसे, ज्ञानेश्वर जोगदंड, कृष्णा जोगदंड, श्रीजीत गुंठाळ, प्रताप शिंदे, सुरज हुंबे, रामु जोगदंड, कोंडीराम जोगदंड, मोहन शिंदे, नितीन शिंदे, समाधान नाईकवाडे यांच्यासह अंसख्य शिवप्रेमी मोठया संख्येने उपस्थीत होते.

# बाळनाथ विद्यालय चाकरवाडी १० वीचा निकाल शंभर टक्के



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यावतीने शैक्षणिक वर्ष २४ – २५ च्या इयत्ता १० वीच्या बोर्डाच्या परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आल्या होत्या. परीक्षेचा निकाल १३ मे रोजी जाहीर करण्यात आला असून यात चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालयाने यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम राखत १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

श्री. उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बाळनाथ विद्यालय चाकरवाडी तालुका जिल्हा बीड येथील दहावी च्या विद्यार्थांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या शाळेतून एकूण ४१ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. त्यापैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. २४ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह तर १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत २ विद्यार्थी द्रितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. या शाळेत जगताप दीक्षा भाऊसाहेब ९४.२०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे तर डोईफोडे मानसी चंद्रकांत ९३.६०% द्रितीय, जगताप स्वरूपा अतुल ९३.२०% तृतीय क्रमांक पटकावला आहे. त्याच बरोबर कवडे काजल केशव ९२.८०% , जांभळे वैभव सुरेश ९१.८०%, अनवणे राजनंदिनी राजेंद्र ९०.८०%, पोटरी अंजली श्रीराम ९०.००%, डोईफोडे कन्हैया शशिकांत ८८.४०%, दाइगडे ओमराजे ज्ञानेश्वर ८७.८०% गुण मिळवले आहेत. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री. उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. त्याच बरोबर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. फाटक सर, मुख्याध्यापक टी.आर. जगताप, वर्गशिक्षक श्री कदम सर, परीक्षा विभाग प्रमुख श्री. नकाते सर सर्व शिक्षक कर्मचारी ग्रामस्थ व सर्व पंचक्रोशीतील पालक यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे व विद्यार्थ्यांच्या पुढील त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याबद्दल अफरानचे अभिनंदन

बीड । प्रतिनिधी



नुकताच महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि माध्यमिक शिक्षण महामंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये सामान्य कुटूंबात वाढलेल्या शेख अफरान अतिक याने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत ८६.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. हिंगणी हवेली येथील शेख अतिक यांचा मुलगा असलेल्या अफरानला ५०० पैकी ४३३ गुण मिळाले.

अफरान हा न्यू हायस्कूल गेवराईचा विध्यार्थी आहे. आपल्या आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अफरान हा मेहनत घेत आहे. अफरानच्या यशा निम्मित सर्व शिक्षक वर्गाने आणि सहकाऱ्यांनी त्याचे कौतुक केले आहे. त्याच्या या यशा बद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अफरानला पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा.

## अयान जलील शेख यांची NPTEL परीक्षेत सुवर्ण कामगिरी

बीड । प्रतिनिधी

शहरातील रहिवाशी अयान जलील शेख यांनी संगणक अभियांत्रिकीचे बी.टेक. IIT कानपूरद्वारे आयोजित 'Enhancing Soft Skills and Personality' या NPTEL कोर्समध्ये ९१% गुण मिळवत सुवर्ण प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे त्यांनी देशभरातील हजारो विद्यार्थ्यांमध्ये टॉप १% टॉपर्समध्ये स्थान मिळवले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



अयान शेख हे बीड शहरातील रहिवासी असून त्यांचे वडील जलील शेख हे महावितरण कंपनीमध्ये ग्रामीण भागात सेवेत आहेत. या निकालानंतर अयान शेख यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, आजच्या तंत्रज्ञानप्रधान जगात सॉफ्ट स्किल्स तांत्रिक कौशल्यांइतक्याच महत्त्वाच्या आहेत. प्रभावी संवाद, सहकार्य, आणि भावनिक समजूतदारपणा यामुळे मानसिक आरोग्य सुधारते आणि कार्यक्षमतेत वाढ होते. आई-वडिलांनी त्यांच्या करिअर आणि शिक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच बीड शहरातील जुना बाजार येथे असलेल्या नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्दिकी नवीद यांचेही त्यांना इयत्ता दहावी पासून सातत्याने मार्गदर्शन मिळत आहे.

यामुळे आपल्या या विद्यार्थ्याच्या अलौकिक यशामुळे प्राचार्य सिद्दिकी नवीद यांनीही अयान शेख यांना भरभरून शुभेच्छा देत अभिनंदन केले आणि त्यांनी यापुढेही स्वत:सह आई-वडील, गुरुजन वर्ग आणि बीड जिल्ह्याचे नाव संपूर्ण भारतात उज्वल करावे अशा सदिच्छा व्यक्त केल्या. या शिवाय अयान शेख यांनी मिळविलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक आणि सहाध्यायींनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.

## दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याबद्दल अलफैजचे अभिनंदन

बीड । प्रतिनिधी



नुकताच महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि माध्यमिक शिक्षण महामंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या मध्ये सामान्य कुटूंबात वाढलेल्या शेख अलफैज मुसा याने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत ९५.४०% गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. हिंगणी हवेली येथील शेख मुसा यांचा मुलगा असलेल्या अलफैजला ५०० पैकी ४७७ गुण मिळाले. अलफैज हा गेवराई येथील शारदा विद्यामंदिरचा विध्यार्थी आहे. आपल्या आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अलफैज हा मेहनत घेत आहे. अलफैजच्या यशा निम्मित सर्व शिक्षक वर्गाने आणि सहकाऱ्यांनी त्याचे कौतुक केले आहे. त्याच्या या यशा बद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अलफैजला पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा.


## दिमाखवाडीच्या सानिका देवकर, रोहण देवकरचे दहावीच्या परीक्षेत यश

बीड । प्रतिनिधी

सेंट झेवियर्स स्कूल, गेवराई च्या सानिका संतराम देवकर हिने दहावीच्या परीक्षेत ९४.६० टक्के तर व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीडच्या रोहन बप्पासाहेब देवकर या विद्यार्थ्याने ९१.४० टक्के घेऊन यश संपादन केले. या यशाबद्दल दोघांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.



दिमाकवाडी तालुका बीड येथील सानिका संतराम देवकर या विद्यार्थीनिने मराठीमध्ये ९१, हिंदी ८४, इंग्रजी ९६, गणित ९६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ८९, सामाजिक विज्ञान ९८ गुण मिळवत यश संपादन केले. तर रोहण बप्पासाहेब देवकर याने मराठीमध्ये ८८, संस्कृत ९३, इंग्रजी ८७, गणित ७६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ९६, सामाजिक विज्ञान ९३ गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल सानिक आणि रोहनचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## दहावीच्या परीक्षेमध्ये भक्ती लाडला मिळाले १०० टक्के

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील सेंट अँथनी इंग्लिश स्कूल, अंबाजोगाई येथील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थिनी भक्ती बालासाहेब लाड हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये १०० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

भक्तीने गणित आणि संस्कृत या विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवले असून, कला क्षेत्रातील गायन विषयातील प्राविण्याबद्दल अतिरिक्त गुण मिळाल्यामुळे तिचे एकूण गुण १०० टक्के झाले आहेत. तिच्या या उत्तुंग यशाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. शाळेच्यावतीने तसेच पालक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींनी भक्तीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सिद्धीविनायक गणपती मंदिर यशवंतनगर येथे संकष्ट चतुर्थीनिमित्त गायत्री यज्ञ

बीड । प्रतिनिधी

गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने दिनांक १६/०५/२०२५ शुक्रवार वैशाख वद्य संकट चतुर्थी निमित्त गायत्री यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.या यज्ञाचे यजमान- गायकवाड साहेब सपरिवारअ.वि.गा.परिवार बीड हे होते.

शिध्दिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड चे अध्यक्ष ड मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा यज्ञ करण्यात आला.या गायत्री यज्ञाला पुरोहित म्हणून गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक मोहन महाराज खरमाटे, व रत्नपारखी काका यांनी होते. यावेळी यशवंत नगर मधील असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीर जवानांसाठी व राष्ट्रासाठी आहुती

सध्या राष्ट्रामध्ये युद्ध परिस्थिती आहे. या युद्धात काही जवान देशासाठी शहीद झाले. त्याच्यासाठीही आहुती देण्यात आली तसेच राष्ट्राला ही आहुती अर्पण करण्यात आली. गर्भ संस्कार कालच्या गायत्री यज्ञ वेळी गर्भवती मातेवर गर्भ संस्कार करण्यात आले. व होणाऱ्या बाळा वर काही अरिष्ठ येऊ नये म्हणून ग्रंथराज ज्ञानेश्वरी वाचन करणे, भगवंताचे नामस्मरण,आणि दररोज गायत्री मंत्र पठन करण्यास सांगितले. सामूहिक आरती होऊन कार्य कर्माची सांगता झाली.




कडा : आष्टी साबलखेड नगर रस्ता बनवण्याचे काम चालू असून रस्त्याच्या दोन्हीही बाजुने गटारी बनवल्या रस्त्यावर पडणारे पाऊसाचे पाणी जाण्यासाठी त्या गटारीला पाईप हि लावली खरी परंतु रस्ता बनवताना ते पाईपच बुजवून रस्ता बनवला परिणामी पाणी गटारातून जायला जागाच राहिली नसल्याने रस्त्यावरच पाणी साचलेले दिसत आहे. संबंधित अधिकारी, ठेकेदार यांनी हे पाणी जाण्यासाठी योग्य तो पर्याय लवकरच करावा. व पाणी जाण्याचा मार्ग मोकळा करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## इंजि. देविसिंह शिंदे यांच्या पाठपुराव्याला पोलिस अधिक्षक नवनीत कॉंवत यांची साथ

बीड । प्रतिनिधी

डिजिटल सिग्नेचरच्या तांत्रिक कारणामुळे मागील दीड महिन्यापासून पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये पासपोर्टचे प्रस्ताव प्रलंबित होते. अनेकांना यासाठी चकरा माराव्या लागत होत्या. या प्रश्नी पोलीस अधीक्षकांना निवेदन दिल्यानंतर त्यांनी तात्काळ या प्रकरणी लक्ष घालून डिजिटल कारवाई संदर्भात निर्देश दिले.

स्वत: देविसिंह शिंदे हे सॉफ्टवेअर इंजिनिअर असल्यामुळे त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम व योग्य पाठपुरावा केल्यामुळे डिजिटल सिग्नेचरचा तांत्रिक बिघाड लवकर दुर होऊन एकाच दिवसात बीड जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातील पासपोर्ट विभागातील सर्व प्रलंबित प्रस्ताव मंजुर होऊन पुढे दाखल झाले व मार्गी लागल्याची विक्रमी कामगिरी बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच झाली. त्यामुळे कालच दि. १६/०५/२०२५ वार शुक्रवार रोजीच गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस अधिक्षक कार्यालयातील पासपोर्ट विभागात प्रलंबित असलेले पासपोर्टचे सर्व प्रस्ताव मंजुर होऊन पुढे दाखल होत मार्गी लागले आहेत, अशी माहिती जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इंजि. देविसिंह शिंदे यांनी दिली.

या संदर्भात त्यांनी सांगितले की, गेल्या दीड महिन्यापासून पोलीस अधिक्षक कार्यालयातील पासपोर्ट विभागाच्या निरीक्षकांच्या डिजिटल सिग्नेचरचा तांत्रिक प्रश्न निर्माण झाल्यामुळे अनेक नागरिकांचे पासपोर्टचे प्रस्ताव प्रलंबित होते. अभिजीत उबाळे यांनी या संदर्भातील माहिती दिल्यानंतर मी स्वत: पोलीस अधीक्षक कार्यालयातील कर्मचारी सत्यनारायणजी खेत्रे यांच्याशी संपर्क साधून अडचण समजून घेतली. दि. २ मे रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांना भेटून निवेदन दिले. पोलिस अधिक्षकांनी तातडीने या प्रश्नी लक्ष घालत संबंधीत अधिकाऱ्यांना निर्देश दिल्यानंतर डिजिटल सिग्नेचर सुधारीत करण्यात आले असून काल दि. १६/०५/२०२५ वार शुक्रवार रोजी एकाच दिवसात बीड जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातील पासपोर्ट विभागातील सर्व प्रलंबित प्रस्ताव मंजुर होऊन पुढे दाखल होत मार्गी लागल्याची विक्रमी कामगिरी बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच झाली. पोलिस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी हा प्रश्न तातडीने सोडविला, त्याबद्दल त्यांचे आभार मानत असल्याचे जिजाऊ प्रतिष्ठानचे इंजि. देविसिंह शिंदे यांनी म्हटले आहे.

## सत्यशोधक पद्धतीने पार पडला सोनपेट नगरीत पहिला सत्यशोधक पद्धतीचा विवाह

सिरसाळा । प्रतिनिधी

सोनपेट नगरीत प्रथमच जुन्या रूढी परंपरेला छेद देत हा आगळा वेगळा विवाह सोहळा तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. लहुजी नगर, सोनपेठ येथील सौ.सिंधूबाई गोरखनाथ चव्हाण यांची जेष्ठ कन्या चि.सौ.का.शुभांगी आणि नामदेव नगर, पाथरी येथील सौ.हौसाबाई श्रीरंग कांबळे यांचे द्वितीय चिरंजीव अनिल यांचा सत्यशोधक विवाह मोठ्या थाटामाटात यशोधरा विद्यालय, लहुजी नगर, सोनपेठ येथे दि.१६ में २०२५ रोजी सदर विवाह सोहळा संपन्न झाला. लग्न सोहळ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, वस्ताद लहुजी साळवे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे या महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. तद्नंतर लग्न लावण्यात आले. नंतर वधू-वरास शपथ देण्यात आली.

सत्यशोधक पद्धतीने संपूर्ण विवाह सोहळा विधीकर्ते नितीन कांबळे यांच्या मार्फत पार पाडला. हा अनोखा विवाह सोहळा पाहण्यासाठी



समाज बांधवांनी गर्दी केली होती. चव्हाण आणि कांबळे परिवारांनी आपल्या मुलांचा विवाह हा सत्यशोधक पद्धतीने लावून एक आदर्श निर्माण केला आहे. या विवाहाचे वैशिष्ट्ये वधू-वरांनी एकमेकास कोणत्याही प्रकारच्या मध्यस्थीशिवाय निर्मिकाला साक्षी ठेवून उपस्थित समाजातील गणमान्य व्यक्तीसमोर जाहीररित्या शपथ घेऊन एकमेकास तसेच आपल्या परिवारास समजून घेऊन सांभाळ करण्याचे वचन दिले. कोणत्याही प्रकारचे व्यसन न करण्याचे वचन, एकमेकास कधीही आणि कोणत्याही परिस्थितीत अंतर न देण्याचे वचन, सप्तपदी ऐवजी सत्य, प्रेम, विवेक, अहिंसा, श्रम, सदाचार आणि परिवर्तन या सात तत्वांना मान्य करण्याचे वचन दिले. धान्याच्या अक्षता ऐवजी फुलांचा अक्षता वधू-वरांच्या डोक्यावर टाकला गेला. पारंपारिक मंगलाष्टका ऐवजी महात्मा फुले यांनी रचलेली मंगलाष्टके म्हटली गेली. ही मंगलाष्टके संस्कृत ऐवजी स्पष्ट आणि सर्वांना समजेल अशा सोप्या मराठीत लिहिलेल्या आहेत त्याचे वचन केले गेले. सत्यशोधक विधीकर्ते नितीन कांबळे यांनी विवाहाचे संपूर्ण मार्गदर्शन केले.

या विवाह सोहळ्याला समाज बांधव दोन्ही कुटुंबावर प्रेम करणारे आप्तस्वकीय, मित्र मंडळी बंधू भगिनी तसेच सामाजिक, राजकीय वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर अनुसूचित जाती जमाती भाजपा जिल्हा उपाध्यक्ष आयु. मारुती रंजवे, सामाजीक कार्यकर्ते आयु. उत्तम मुंडे, मा.नगरसेवक शरद बनसोडे या सत्यशोधक विवाह सोहळ्याचे आयोजक आयु.आकाश भैय्या चव्हाण, मा.नगरसेवक आयु. दत्ता पांढरे, आयु. परसराम तिरमले, आयु.बापु किरवले, मोटे सर, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डी.जे. मस्के, मा.नगरसेवक लक्ष्मण कांबळे, पाथरी या सह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर विवाह सत्यशोधक पद्धतीने व्हावा ही संकल्पना सत्यशोधक युवा संघटनेचे मल्हारजी कसबे यांनी मांडली व क्षणाचाही विलंब न करता दोन्ही परिवारांनी ती मान्य केली. विशेष म्हणजे वधू-वरांनी सुद्धा आनंदाने होकार दिला.

# जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब तलाठी शिवाजी हजारे याच्यावर कारवाई का होत नाही ?

## शेतकऱ्यांची आर्थिक लूट व अरेरावीची भाषा करणाराची गय का केली जाते ?

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी सज्जावर असणारे तलाठी शिवाजी हजारे यांच्या विषयी वारंवार उपजिल्हाधिकारी यांना निवेदन व तक्रारी केल्या असताना हजारे यांच्यावर कारवाई का होत नाही असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. हजारे तलाठी याची चुकून एखाद्या शेतकऱ्याची भेट झाली तर त्या शेतकऱ्याला दलाला मार्फत आर्थिक पैशांची मागणी करणे व तरच तुमचे काम होईल असे सांगणे किंवा शेतकऱ्यांनी कामाची चौकशी केली तर त्यांना अरेरावीची भाषा वापरणे तसेच कधीही सज्जावर हजर न राहणे शेतकऱ्यांनी फोन केला तर फोन न ऊचलने व बायपास रोड वरील एका हॉटेलमध्ये बसून शेतकऱ्यांना तेथे बोलून पैशाची डील करणे व तेथे आर्थिक देवाणघेवाण करणे असे एक ना अनेक कारणे असताना या तलाठ्यावर कारवाई का होत नाही यामुळे शेतकरी संतप्त झालेले आहेत.



याविषयी शेतकऱ्यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालय माजलगाव या ठिकाणी तक्रार अर्ज पण दिलेला आहे व वारंवार तक्रार करूनही या तलाठ्याची गय का केली जाते असा सवाल या ठिकाणी बीडचे जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब यांना यावेळी शेतकऱ्यांनी केलेला आहे. या तलाठ्याला पैसे दिले तरच काम होते नाहीतर कागदपत्रे घेऊन यांच्या मागे फिरावे लागते फोन केला तर फोन घेत नाही किंवा कधी चुकून भेट झाली तर त्या शेतकऱ्याला बायपास रोडवरील एका हॉटेलमध्ये बोलावले जाते व दलाला मार्फत पैशाची मागणी केली जाते व पैसे दिले नाहीत तर ते काम होत नाही काहीतरी त्रुटीचे कारण दाखवून किंवा अपुरे कागदपत्राचे कारण दाखवून ते काम टाळले जाते त्यामुळे शेतकरी हैराण झालेले आहेत व हा तलाठी सातबाराला नाव लावण्यासाठी किंवा फेर करण्यासाठी किंवा आडनाव लावण्यासाठी २५ ते ३० हजार रुपयाची मागणी करतो व नाही दिले तर ते काम करत नाही व खुलेआम धमकी देतो अशी शेतकऱ्यांमध्ये चर्चा ऐकायला मिळत आहे त्यामुळे या तलाठ्यावर जर तात्काळ कार्यवाही नाही केली तर जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांमार्फत आक्रोश मोर्चा काढण्यात येईल असा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिलेला आहे.

# उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांची ॲड. संगिता चव्हाण यांना सदिच्छा भेट

## अहिल्यानगर येथे तब्येतीविषयी आस्थेवाईकपणे विचारपूस

अहिल्यानगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी ॲड. संगिताताई चव्हाण यांची आज अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली.



अहिल्यानगर – पुणे महामार्गावरील अपघातात जखमी झालेल्या शिवसेना संपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य ॲड. संगिताताई चव्हाण यांच्यावर अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्यावर झालेल्या शस्त्रक्रियेनंतर महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी आज अहिल्यानगर दौऱ्यावर असताना ॲड. संगिताताई चव्हाण यांची आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची आज अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली.

या वेळी डॉ. निलमताई गोऱ्हे यांना जिल्हाशल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांनी ॲड. संगिताताई चव्हाण यांच्यावर आणि त्यांचे सहकारी फर्जना शेख व विशाल गणोरकर यांच्यावर चालू असलेल्या उपचारासंबंधी आणि तब्येतीची माहिती दिली. ॲड. संगिताताई चव्हाण आणि सहकाऱ्यांवर चालू असलेल्या उपचारांवर डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी समाधान व्यक्त केले.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी संदर्भात वंचितची जिल्हा बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेत बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने आज शुक्रवार दि.१६ मे रोजी बीड जिल्हा वंचित बहुजन आघाडीची बैठक दुपारी बारा वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे संपन्न झाली.



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील वंचित बहुजन आघाडीची सत्ता यावी, या दृष्टीने वंचित बहुजन आघाडी तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये वंचितचा झेंडा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी तालुकाध्यक्षांसह सर्व कार्यकर्त्यांना बोलताना व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा झाली.

याप्रसंगी बीड जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडी बीड पश्चिम जिल्हा कार्यकारिणी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर महिला जिल्हाध्यक्ष अनितताई चक्रे माथाडी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आकाश जावळे, महासचिव खंडू नाना जाधव, इंजि. विष्णू देवकाते, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, सचिन मेघडबर, भीमराव औसरमल, संदीप रोकडे, भारत तांगडे, धम्मानंद साळवे, किरण वाघमारे, अजय गायकवाड, किशोर भोले, अंकुश जाधव, धम्मानंद पोळ, डॉ.गणेश खेमाडे, जंजाळ सर, लखन जोगदंड, मिलिंद सरपते, संदीप जाधव, उमेश तुळवे, राजेश जोगदंड, प्रभाग निहाय गण, गटनिहाय कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# मुलींची शिक्षणातील गुणवत्ता ही महिलांच्या स्थित्यंतराची साक्ष : डॉ.शुभांगी बडे

बीड । प्रतिनिधी

कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शिक्षण कार्यात लक्ष्मीबाई दुधातील साखरेसारख्या एकरूप झाल्या होत्या; वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांनी मुलांसारखे जपले. सावित्रीबाई फुलेंनी सुध्दा मुलींच्या शिक्षणाचा तेजोमय प्रवास सुरू केला, असे सांगत सद्यस्थितीतील मुलींची शिक्षण क्षेत्रातील उच्च गुणवत्ता ही महिलांच्या सकारात्मक परिवर्तन आणि स्थित्यंतराची साक्ष आहे, असे मत आरोग्य क्षेत्रातील सुप्रसिद्ध डॉ.शुभांगी बडे यांनी मत व्यक्त केले.



दहावी बोर्ड परीक्षे मध्ये रेसिडेन्शिअल हायस्कूल ॲंड ज्युनिअर कॉलेज मधून गुणवत्ता प्राप्त केल्याबद्दल कु.सिद्धी बिभिषण चाटे हिचा सत्कार शाल श्रीफळ सन्मानपत्र देऊन करण्यात आला. त्यावेळी डॉ. शुभांगी सोमनाथ बडे बोलत होत्या. यावेळी डॉ.सोमनाथ बडे, सुप्रसिद्ध विधीज्ञ ॲड. संजय सानप, अध्यात्मक क्षेत्रातील जेष्ठ मार्गदर्शक रामदास काका बडे, सौ. वैशालीताई बडे, प्रा.बिभिषण चाटे, हिंदी साहित्य क्षेत्रातील अभ्यासाक आदर्श शिक्षिका आशाताई चाटे– फड, आदी सह उपस्थित होते.

विधिज्ञ संजय सानप यांनी विद्यार्थ्यांनी बालपणापासून खडतर परिश्रम आणि योग्य दिशेने जात शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार प्रमाणिकपणे अभ्यास केल्यास योग्य दिशा मिळते असे सांगितले. डॉ. सोमनाथ बडे यांनी कु. सिद्धी चाटे हिने उत्तुंग यश प्राप्त केल्याबद्दल कौतुक करत अभिनंदन आणि भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ मार्गदर्शक रामदास काका बडे यांनी ईश्वराचा सदैव हात कु. सिद्धीच्या पाठीमागे राहील असा आशीर्वाद दिला.

शिक्षकांनी केलेले नियमित अध्यापन, मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन तसेच आई–वडिलांनी परिश्रम घेण्यासाठी सातत्याने केलेला पाठपुरावा आणि केलेला नियोजनबद्ध अभ्यास याचा एकत्रित परिणाम म्हणून हे यश प्राप्त झाले! अशी प्रतिक्रिया गुणवंत विद्यार्थिनी कु.सिद्धी चाटे हिने सत्कारा नंतर आपल्या मनोगतात व्यक्त केली आणि सर्वांचे आभार मानले.

# शालांत परीक्षेत श्री राजर्षी शाहू विद्यालय तळेगाव (घाट) शाळेचे यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील तळेगाव (घाट) येथील अभिनव शिक्षण संस्था, अंबाजोगाई



वेदश्री मुकुंद सिरसाट (९७.४०) रेणुका कोंडीराम वाघमारे (९०.८०) श्रीनिवास संतोष कांबळे (८८.८०)

संचालित श्री राजर्षी शाहू विद्यालय या शाळेने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले. या वर्षी शाळेचा निकाल ९२.८५ टक्के आहे. अभिनव शिक्षण संस्था, अंबाजोगाई संचालित श्री राजर्षी शाहू शाळेचे विशेष प्रविण्यात १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम श्रेणीत ८ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

शाळेच्या वेदश्री मुकुंद सिरसाट हिने (९७.४०) टक्के गुण घेऊन बर्दापूर केंद्रातून व शाळेतून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. तर कु.रेणुका कोंडीराम वाघमारे हिने (९०.८०) टक्के गुण घेऊन द्वितीय येण्याचा आणि श्रीनिवास संतोष कांबळे या विद्यार्थ्याने (८८.८०) टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव शिवाजी चन्नागिरे, सर्व संस्था संचालक मंडळ, बीड जि.प.चे माजी सदस्य संजय गिराम, तळेगाव (घाट) व वालेवाडी गावचे सरपंच, सेवा सहकारी सोसायटी चेअरमन, ग्रामस्थ, पालक, शाळेचे माजी विद्यार्थी, युवक यांनी शाळेचे मुख्याध्यापक, विद्यार्थ्यांचे पालकांचे, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन केले. यशाबद्दल पालकवर्ग आणि ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांचे व शाळेचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मंत्री विजय शहाला भारत देशातून हद्दपार करून देशद्रोहचा गुन्हा दाखल करा : आझाद क्रांती सेना

सिरसदेवी । प्रतिनिधी

आज दिनांक १५ मे २०२५ रोजी आझाद क्रांती सेनेच्या वतीने महामहीम राष्ट्रपती यांना बीड जिल्हाधिकारी मार्फत मंत्री विजय शहा यांना मंत्री पदावरून हकालपट्टी करून या भारत देशातून हद्दपार करण्यात यावे अशी मागणी आजाद क्रांती सेनेच्या वतीने जिल्हा अधिकारी यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल मंत्री विजय शहा यांनी अपशब्द वापरले असल्याने पूर्ण भारत देशात संताप व्यक्त होत आहे यामुळे मंत्री विजय शहा याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी सामाजिक संघटना आजाद क्रांती सेना यांनी केली आहे.



ज्या अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप नागरिकावरती गोळीबार करून त्यांची हत्या करण्यात आली होती त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर राबवत कर्नल सोफिया कुरेशी विंग कमांडर वैदिका सिंग यांनी पाकिस्तानातील दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांना समूळ नष्ट केले अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम व शौर्याच्या संपूर्ण देश कौतुक करत असताना मध्यप्रदेश सरकारमधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारण्यासाठी त्यांची बहीण पाठवली म्हणत बेताल व बेजबाबदार संताप जनक वक्तव्य करून आपल्या सैनिकांचा अवमान करीत त्यांचं मनोधैर्य खचवण्याचा प्रयत्न केला आहे अशा मंत्र्याला संविधानिक पदावरती राहण्याचा कुठलाही अधिकार नाही म्हणून महामहीम राष्ट्रपती यांनी विजय शहा याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून त्याच्यावरती देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आझाद क्रांती सेनेच्या वतीने राष्ट्रपती यांना बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. याप्रसंगी आझाद क्रांती सेना, बीड जिल्हाप्रमूख नाना भिसे, उपजिल्हाप्रमूख कृष्णा पाटोळे, गवळी मामा, श्याम पाटोळे, अविनाश पाटोळे, राम पाटोळे, अमर पाटोळे, जयाताई लांडगे तसेच आजाद क्रांती सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



तिडके आणि सानप या विवाह प्रसंगी वधूवरांना शुभ आशीर्वाद देण्यासाठी आशीर्वाद लॉन्स बीड येथे उपस्थित ह भ प महंत आप्पासाहेब चौरे महाराज मठाधिपती श्री चंद्रशेखर बाबा मठ संस्थान श्रीक्षेत्र चोंडी तालुका धारूर.

# श्री विनायकराव माध्यमिक विद्यालयाचे दहावीच्या बोर्ड परीक्षेत घवघवित यश

बीड । प्रतिनिधी

श्री विनायकराव माध्यमिक विद्यालय, वैध्यकिन्ही ता.पाटोदा जि. बीड या शाळेने नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश यशाची परंपरा कायम राखली असून शाळेचा निकाल १००% टक्के लागलेला असून विद्यालयातून कु.जोगदंड सुजाता बबन ९३.४०% गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे. बांगर विशाल त्रिंबक ९३% टक्के गुण घेऊन दुतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.

बावणे पार्थ मधुकर ९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. याशिवाय कुमारी बावणे अंकिता सिताराम ९२% ची ओमकार विष्णू आजबे ८९ % कु. बांगर राजश्री रामकिसन ८८.८०% ची. येडे वैभव कुंडलिक ८८.६०% कु. कदम पुनम भास्कर ८७.४०% याप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून सदरील यशाबाबत संस्था सचिव भागवत (अण्णा) आजबे, संस्था अध्यक्ष बाजीराव (अण्णा) बांगर, संस्था पदाधिकारी मुख्याध्यापक बांगर, मकाळ सर, कोचाळे सर, बामदळे सर, आजबे सर, वळे सर, जिरेकर सर, मोरे सर, तुपे मॅडम, कवडे मॅडम, शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

# केज शहर अपघातमुक्त होणार का? : पांडुरंग कसबे

केज । प्रतिनिधी

काल दुपारी शहरात अपघाताची जी घटना घडली ती अतिशय संतापजना होती. मीना प्रवीण घोडके या महिला जागीच ठार झालेल्या असून १९ लोक यामध्ये जखमी झालेले आहेत. या घटनेपासून काय धडा मिळाला याचे आत्मपरीक्षण होणे गरजेचे आहे. केज सिटी मध्ये राहणाऱ्या व आजुबाजूच्या खेड्यातून येणाऱ्या प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे, की आपली वाहने रोडवरती उभी राहायला नकोत. शहरात अनेक ठिकाणी प्रशासकीय जागा रिकाम्या आहेत शक्यतो तेथे आपली गाडी पार्क करावी. सद्या जरी फूटपाथची व्यवस्था नसली तरी नवीन बनवलेल्या नाल्यावरून चालावे. नागरिकांनी मुख्य रोडवरून शक्यतो चालणे टाळावे.

ही झाली नागरिकांबाबतची सजगता. परंतु याठिकाणी अनेक छोटे व्यापारी मग ते फळगाडेवाले असतील रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला बसून भाजीपाला विकणारा असेल असे अनेक व्यापारी आहेत जे मुख्य रोडवर आपला व्यवसाय करतात, त्यांनी नालीच्या मागे बसून आपला व्यवसाय करावा. नालीवरून चालणाऱ्याना कुठलाही त्रास होणार नाही याची व्यापारी बांधुनी काळजी घ्यावी. हा प्रत्येकाच्या नैतिकतेचा भाग आहे. थोडीशी विवेक बुद्ध वापरून आपला व आपल्यामुळे इतरांचा जीव धोक्यात येणार नाही याची सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे.



पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करत रस्त्यावर येणाऱ्या ट्राफिकचे नीट व्यवस्थापक करायला हवे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. जेणेकरून भविष्यात असे प्रकार होणार नाहीत. सजग नागरिक अशा संभाव्य घटनांबद्दल जेव्हा पोलिस प्रशासनाला कळवीत असतात, तेव्हा त्यांनी त्वरीत क्शन घेणे गरजेचे असते. तत्काळ घेतलेल्या क्शनमुळे पुढील संभाव्य घटना टळतात हे अनेकदा सिद्ध झालेले आहे. प्रशासनाने कालच्या घटनेतील कंटेनर मागेच अडवला असता तर पुढील अनर्थ टळला असता. असो, या जर–तर च्या जरी गोष्टी वाटत असल्या तरी गांभीर्य मात्र सखोल आहे.

स्थानिक प्रशासनाला यासंदर्भात जाग कधी येणार? आमच्या लोक प्रतिनिधींना अजून असे किती अपघात बघायचे आहेत. आपल्या घरातील व्यक्ती गमावल्यानंतरच आपल्याला जाग येणार आहे का? वर्षभरात कित्येक जण अपघातात मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशी अवजड वाहने जेव्हा शहरातून वाहतूक करतात तेंव्हा जीव मुठीत धरून येथील नागरिक, शाळकरी मुले, महिला, वावरतात. वाहतुकीला पर्यायी व्यवस्था आपण कधी देणार आहोत. यासाठी लोकप्रतिनिधी केव्हा पाठपुरावा करणार आहेत. रोड अथॉरिटीने तत्काळ शहरांतर्गत ठीक ठिकाणी गतिरोधक तयार करणे गरजेचे आहे. सुव्यवस्थित फुटपाथ तयार होणे अत्यावश्यक आहे. शहरामध्ये ब्यारिगेट लावणे आवश्यक आहे. यापूर्वी अनेक संघटनांनी व काही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी केजला बायपास रोड व्हावा यासाठी निवेदने दिलेली आहेत. सर्वमान्य नागरिकांमधूनही तोच सूर निघताना दिसत आहे. शहरासाठी रिंगरोड, बायपास रोड, किंवा उड्डाणपूल होणे अत्यंत गरजेचे आहे. आत्ता येथील लोकप्रतिनिधी यामध्ये किती पुढाकार घेतात. कालच्या घटनेकडे पाहून कितीजण आपली ही मागणी लावून धरतात हे पाहणे गरजेचे ठरणार आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT